<u>नि. फौ. ख. क्र.१३४/२०१९</u> निशाणी २५

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – पंचफुला किसन वानखडे

वय – अं. ५७ वर्षे, व्यवसाय – मजुरी

पत्ता – रा. मांडोली, ता. बाळापूर, जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी दि.२५.१०.२०१८ रोजी घरी होते. त्या दिवशी सकाळी ११ वा. सुमारास मी घरी हजर असताना शिवाजी होनाळे व भानाजी होनाळे यांनी ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमधून कुटार भरुन आणले. सदरचे कुटार हे शिवाजी होनाळे व भानाजी होनाळे हे माझ्या अंगणामध्ये टाकत होते. त्यावेळी मी शिवाजी यास माझ्या अंगणामध्ये कुटार टाकू नको असे म्हणाले तसेच त्यावेळी भानाजी हा देखील तेथेच होता. त्यावेळी मला शिवाजी म्हणाला की, ''मी पोलीस पाटील आहे, तुया मायची गांड झवं, तुला जे काही करायचे ते करुन घे.'' त्यानंतर शिवाजी होनाळे याने मला त्याच्या हातातील विळा मारत असताना मी तो वाचविण्याचा प्रयत्न केला त्यावेळी सदर विळा हा माझ्या डाव्या हाताच्या अंगठ्याला लागला. त्यामुळे माझ्या डाव्या हाताच्या अंगठ्याला दुखापत झाली व त्यामधून रक्त निघाले. त्यानंतर शिवाजी होनाळे व भानाजी होनाळे हे तेथून पळून गेले. मी सदर घटनेची माहिती देण्याकरीता पो.स्टे. येथे गेले. तेथून मला पोलीसांनी वैद्यकीय उपचाराकरीता बाळापूर येथील ग्रामीण रुग्णालय येथे पाठविले. तेथे माझ्यावर उपचार केला. त्यानंतर मी पो.स्टे. शिवाजी होनाळे व भानाजी होनाळे यांच्या विरुध्द फिर्याद दिली.

२. आता मला सदर फिर्याद दाखविण्यात आली. सदर मुळ फिर्यादी जबाबाच्या उजवीकडील भाग फाटलेला दिसून येत आहे. त्यामुळे त्यावरील अंगठा किंवा सही तसेच काही मजकूर दिसून येत नाही. सदर फिर्यादीतील मजकूर पोलीसांनी मला वाचून दाखविला त्यावर माझा उजव्या हाताच्या अंगठ्याचे निशाण उमटविले होते. सदर फिर्यादीस **नि.क्र.२६** देण्यात येत आहे. आता मला छापील फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझा उजव्या

हाताचा अंगठ्याचे निशाण असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२७** देण्यात येत आहे.

३. सदर गुन्ह्याबाबत पोलीसांनी माझी विचारपुस केली होती. पोलीसांना मी घटनास्थळ दाखविले होते. ज्या विळ्याने मला मारुन दुखापत केली तो मी पाहिल्यास ओळखू शकतो. आता मला न्यायालयात लोखंडी विळा त्यास लाकडी मुठ त्यावर ५८/२०२४ नमुद केलेला विळा सादर करण्यात आला. तो विळा तोच असून शिवाजी होनाळे याने मला मारले होते. त्यास **आर्टीकल १** देण्यात येत आहे. आरोपी क्र.१ व २ यांना मी ओळखू शकते. आरोपी क्र.१ आज न्यायालयात हजर आहे. आरोपी क्र.२ याच्या ओळखीबाबत कोणताही वाद नसल्याचे त्यांच्या वकीलांकडून मान्य.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती एच. बी. टिकार यांचे मार्फत उलटतपासः</u>**

४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ याने माझ्या विरुध्द दिवाणी केस बाळापूर येथील न्यायालयात दाखल केली आहे, तेव्हापासून त्याच्या सोबत माझे पटत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी शेतामध्ये मजूरीसाठी जाते त्यावेळी मला विळ्याने काम करावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, विळ्याने काम करीत असताना माझ्या हातास बऱ्याच वेळा जखमा होतात. हे म्हणणे खरे नाही की, सगळ्या शेतकऱ्यांकडे आर्टीकल १ कडील दिसणारे विळे असतात. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरी देखील विळे, खुरपे आहेत.

५. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या गावातून बाळापूर येथे येण्याकरीता दिवसभर रिक्षा उपलब्ध असते. मांडोली येथून बाळापूर ला रिक्षाने येण्याकरीता १५ मि. अवधी लागतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ व २ यांनी मला शिवीगाळ केली तसेच आरोपी क्र.१ याने मला विळ्याने मारुन माझ्या डाव्या अंगठ्याला दुखापत केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल १ कडील विळा माझ्या घरातील असून तो मी पोलीसांना दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी विरुध्द खोटा रिपोर्ट दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या फिर्यादी जबाब पोलीसांनी मला वाचून दाखविला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला लिहीता वाचता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला लिहीता वाचता येत नसल्याकारणाने सदर फिर्यादी जबाबामध्ये काय मजकूर

आहे, हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– १२.०९.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.09.13 10:52:06 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | १२/०९/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | १२/०९/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | १३/०९/२०२५ |